# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.07.2025** **वार:सोमवार**

---

1. मराठा साम्राज्याच्या किल्ल्यांचा युनेस्कोच्या वारसा स्थळांमध्ये समावेश; ही देशवासियांसाठी अभिमानाची बाब असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. लोकसभेत आज ऑपरेशन सिंदूरवर चर्चा
3. अमेरिका आणि युरोपियन संघादरम्यान 15 टक्के कर करार
4. मनसादेवी मंदिर चेंगराचेंगरीत आठजण ठार
5. फिडे अजिंक्यपदासाठी कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यात आज निर्णायक लढत आणि
6. भारत-इंग्लंड चौथी कसोटी अनिर्णित

**मन की बात**

मराठा साम्राज्याच्या 12 किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून युनेस्कोची मान्यता मिळणं, ही देशवासियांसाठी अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमाच्या 124 व्या भागात देशवासियांशी संवाद साधताना काढले. संस्कार आणि स्वाभिमानाचं प्रतिक असलेल्या या गड-किल्ल्यांना आवर्जून भेट देण्याचं आवाहन मोदी यांनी नागरिकांना केलं.

पारंपरिक वस्त्रोद्योग हे देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचं प्रतीक असून आत्मनिर्भरतेच्या वाटचालीत या क्षेत्राचा मोठा वाटा असल्याचं पंतप्रधान म्हणाले. येत्या सात ऑगस्टला साजऱ्या होत असलेल्या दहाव्या राष्ट्रीय हातमाग दिवसाचा उल्लेख करुन, सध्या देशभरात तीन हजारापेक्षा जास्त वस्त्रोद्योग स्टार्ट-अप्स सक्रीय असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी पैठणमधील पैठणी विणकर कविता ढवळे यांची यशोगाथा त्यांनी सांगितली.

गेल्या काही दिवसात क्रीडा, अंतराळविज्ञान अशा अनेक क्षेत्रात भारतानं अभिमानास्पद कामगिरी केली असल्याचं सांगून पंतप्रधानांनी शूभांशू शुक्ला आणि त्यांच्या मोहीमेचा आवर्जून उल्लेख केला. येत्या 23 ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय अंतराळ दिनासाठी आपल्या संकल्पना, नमो ॲपवर पाठवण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

ऑगस्ट महिन्यात येणारा स्वातंत्र्यदिन, क्रांतिदिन, फाळणीच्या वेदनांचं स्मरण करून देणारा 14 ऑगस्टचा फाळणी वेदना स्मृती दिन याबरोबरच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी, खुदीराम बोस यांचं बलिदान, गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेलं भारत छोडो आंदोलन, स्वदेशी चळवळ, यांसारख्या महत्त्वाच्या घटनांचं स्मरण त्यांनी केलं. तसंच स्वदेशी उत्पादनांची खरेदी करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

**कविता ढवळे-पैठण**

पैठणमधल्या कारागिर कविता ढवळे यांच्या कामाची दखल पंतप्रधानांनी मन की बातमध्ये घेतल्यानंतर कविता यांनी आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या....

**मन की बातमध्ये पंतप्रधानांनी दखल घेतली तर मी त्यांचे सगळं पैठणमधल्या तीनशे कारागिरांतर्फे मी त्यांचं स्वागत करते तर मी त्यांचे खूप खूप आभारी आहे की त्यांनी आमच्या कारागिरांची दखल घेतली. भारताच्या पंतप्रधानांनी आपलं नाव घेतलं याच्यापेक्षा आनंद आणि याच्यापेक्षा मोठा पुरस्कार कुठलाच नाही. त्याच्यामुळं मी खूप आभारी आहे मला खूप आनंद झाला. मी माझ्यासोबत माझ्या पैठणमधले सर्व विणकर आहेत त्यांचं पण प्रतिनिधित्व करते. पैठणी आहे ज्यांना काना-कोपऱ्यामध्ये जर माहीत नाही तर त्यांच्यापर्यंत या पंतप्रधान याच्या माध्यमातून तिथे पोहोचेल, तर आम्हाला आणखीन असेच म्हणजे पैठणीला चालना मिळेल, असं मला नक्की वाटतं.**

**भारत-यूके पीयूष गोयल**

भारत आणि ब्रिटन यांच्यातला मुक्त व्यापार करार हा केवळ व्यापार करार नाही; तो विकसित भारताच्या दिशेने टाकलेले एक धाडसी आणि परिवर्तनशील पाऊल आहे, असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल मुंबईत सांगितलं. मत्स्य व्यवसाय, वस्त्र, रत्न आणि दागिने, आयटी, सेवा क्षेत्र आणि एमएसएमई यांसारख्या क्षेत्रांना या करारामुळं आंतरराष्ट्रीय बाजारात नव्या संधी उपलब्ध होतील, असं गोयल म्हणाले.

**लोकसभा**

लोकसभेत आज ऑपरेशन सिंदूरवर चर्चा सुरू होण्याची अपेक्षा आहे. लोकसभेत चर्चेसाठी 16 तासांचा वेळ देण्यात आला आहे तर राज्यसभा उद्या 16 तास यावर चर्चा होईल, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. या चर्चेसाठी सरकारनं पहिल्या दिवसापासूनच सहमती दर्शवली होती असंही त्यांनी नमूद केलं.

**अमेरिका-युरोपिय संघ-करार**

अमेरिका आणि युरोपियन संघानं अमेरिकेत येणाऱ्या बहुतांश युरोपियन वस्तूंवर 15 टक्के कर आकारण्याचा करार केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प आणि युरोपियन संघाच्या प्रमुख उर्सुला वॉन डेर लेयन यांनी अटलांटिक महासंघामधील कर संघर्ष संपविण्यासाठी आणि व्यापार युद्ध टाळण्याकरिता हा करार केला असल्याचं काल सांगितलं. अमेरिकेकडून युरोपिय वस्तूंवर 30 टक्के कर आकारला जाण्याची 1 ऑगस्टची अंतिम मुदत जवळ येत असताना हा करार झाला आहे.

**अमेरिका-मुदत**

अमेरिकेतील परस्पर कर लागू करण्याची अंतिम 1 ऑगस्टची मुदत कायम आहे, ती वाढवण्याची कोणतीही योजना नाही असं अमेरिकन प्रशासनानं स्पष्ट केलं आहे. अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं की कोणतीही अतिरिक्त सवलत दिली जाणार नाही आणि कर 1 ऑगस्टपासून लागू होतील. आतापर्यंत, युरोपियन युनियन, ब्रिटन, व्हिएतनाम, इंडोनेशिया, फिलीपिन्स आणि जपान यांनी पुढील आठवड्याच्या अंतिम मुदतीपूर्वी ट्रम्प प्रशासनासोबत व्यापार करारांवर स्वाक्षरी केली आहे.

**थायलंड-कंबोडिया**

थायलंड आणि कंबोडियाचे नेते आज मलेशियामध्ये भेटून प्रदीर्घ सीमा वाद सोडवण्यासाठी चर्चा करतील. थायलंड-कंबोडिया सीमा संघर्षातील मृतांची संख्या बत्तीसवर पोहोचली आहे आणि 130 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. काल चौथ्या दिवशीही संघर्ष सुरू होता. कंबोडियन लोक थायलंडच्या सीमेवरून पळून जात आहेत. दोन्ही राष्ट्रांदरम्यान सामायिक सीमेच्या वादग्रस्त भागात गोळीबार झाल्यानंतर तणाव वाढला, आणि जगभरात चिंता निर्माण झाली.

**उत्तराखंड-चेंगराचेंगरी**

उत्तराखंडमध्ये, हरिद्वारमधील मनसा देवी मंदिराकडं जाणाऱ्या पादचारी मार्गावर चेंगराचेंगरीत काल सकाळी किमान आठ जणांना आपला जीव गमवावा लागला आणि 30 जण जखमी झाले. परिसरात विद्युत प्रवाह पसरल्याच्या अफवेनंतर गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली असं पोलिसांनी सांगितलं. मृतांमध्ये उत्तर प्रदेश, बिहार आणि उत्तराखंडमधील अल्पवयीन आणि वृद्ध यात्रेकरूंचा समावेश आहे. श्रावणाच्या महिन्यानिमित्त भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दरम्यान उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी हरिद्वारच्या अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांना या घटनेची चौकशी करून पंधरा दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल असे ते म्हणाले.

**अलाहाबाद- उच्च न्यायालय-विवाह-नोंदणी**

अलाहाबाद उच्च न्यायालयानं उत्तर प्रदेश सरकारला राज्यात विवाह नोंदणी करणाऱ्या "बनावट" आर्य समाज संस्थांची चौकशी सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. या संस्था वाईट हेतूनं आणि कधीकधी वर आणि वधूच्या वयाची पडताळणी न करता हे विवाह करण्यात गुंतल्या होत्या असा दावा गृह सचिवांना दिलेल्या आदेशात करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी 29 ऑगस्टला होणार आहे.

**बिहार सुनावणी**

बिहारच्या मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकन करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. अपात्र नावे काढून टाकून सुधारित यादी तयार करण्याचं उद्दीष्ट असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. तर या प्रक्रियेत प्रमुख राजकीय पक्ष तसं दीड लाखांहून अधिक बूथस्तरीय मध्यस्थ सहभागी असल्याचा दावा याचिकेमध्ये करण्यात आला आहे. या निर्णयामुळे यंदाच्या वर्षी होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणात मतदार मतदानापासून वंचित राहू शकतात. सूर्य कांत आणि जोयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होण्याची अपेक्षा आहे.

**एनसीबी- अमली पदार्थ -तस्करी**

राजस्थान आणि महाराष्ट्र पोलिसांसह अमली पदार्थ नियंत्रण विभागानं राजस्थानच्या बारमेर जिल्ह्यातील ढोलकिया गावात सिंथेटिक अमली पदार्थांच्या निर्मितीत सहभागी असलेल्या आंतरराज्यीय टोळीला उघडकीस आणलं आहे. या संयुक्त कारवाईत टोळीच्या दोन सदस्यांना ताब्यात घेण्यात आलं. या कारवाईदरम्यान अनेक रसायनं आणि मेफेड्रोन सिंथेटिक पदार्थ तयार करण्यासाठी उपकरणं आढळली असं एनसीबीनं सांगितलं.

**बुद्धिबळ**

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यातील दुसरा डावही काल अनिर्णीत राहिला; त्यामुळं आज होणाऱ्या टाय ब्रेकरमध्ये सामन्याची विजेती ठरेल. हा सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी दीड वाजता सुरू होईल. दोन अटीतटीचे क्लासिकल डाव अनिर्णित राहिल्यानंतर, आता विजेत्याची निवड गतिवर अवलंबून राहील. वेळेवर नियंत्रण आणि संयम महत्त्वाचे ठरतील.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड दरम्यान अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत मँचेस्टर इथला चौथा सामना काल पाचव्या दिवशी अनिर्णित अवस्थेत संपला. कर्णधार शुभमन गिल, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांची झुंजार शतकं तर के एल राहुलच्या 90 धावा भारतीय डावाची वैशिष्ट्यं ठरली. वॉशिंग्टन सुंदरचं हे कारकिर्दीतील पहिलं शतक ठरलं. यजमान संघाच्या 311 धावांच्या आघाडीला प्रत्युत्तर देताना सामना अनिर्णित ठेवत दुसऱ्या डावात भारताने 4 बाद 425 धावा केल्या. यामध्ये जडेजा आणि सुंदर यांची 203 धावांची संयमी भागीदारी महत्वपूर्ण ठरली. तर कर्णधार म्हणून शुभमन गिल कारकिर्दीतील पहिल्याच मालिकेत चार शतकं झळकवणारा जगातील पहिला कर्णधार-फलंदाज बनला आहे.

**गुजरात - पाऊस**

गुजरातच्या अनेक भागात मुसळधार पाऊस पडल्यामुळे खेडा आणि अहमदाबादसारख्या विविध जिल्ह्यांमध्ये सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी गांधीनगर इथल्या राज्य आपत्कालीन नियंत्रण केंद्रात बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. राज्यात आज सर्वत्र पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**हवामान**

महाराष्ट्रात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल. किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील, विदर्भ आणि मराठवाड्यातही बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.